MHST160012512024

**रे.दि.मु.नं.२६०/२०२४ मधील नि.क्र.३८**

**खालील आदेश**

**(प्रतिपा प्रताप बाबर वि. रुपचंद निवृत्ती बाबर)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीबाबत आहे ती वस्तुस्थिती ठेवण्याबाबत केलेला आदेश निशाणी ५ चे ताकीद अर्जाचे अंतिम निर्णयापर्यंत वाढवण्यात यावा या करिता दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी क्र.१ ने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकुर अमान्य केला आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी तातडीने निशाणी ५ चे अर्जावर निशाणी ३४ ला म्हणणे दिले आहे. प्रतिवाही हे आज युक्तीवाद करण्यास तयार आहेत. त्यामूळे सदरचा अर्ज मंजूर करता येणार नाही. वादीने दिशाभुल करुन स्थगितीचा आदेश मिळवला आहे. वादी हे निशाणी ५ चे कामकाज चालविण्यास टाळाटाळ करत आहेत. प्रतिवादी क्र.१ ने त्यांचे घराचे नुतनीकरण करण्यासाठी लोखंड, सिमेंट आणले आहे. सदर साहित्याचा वापर न केल्यास ते खराब होईल व प्रतिवादीला नुकसान होण्याच्या उद्देशाने वादी हे निशाणी ५ चे कामकाज चालविण्यास दिरंगाई करत आहेत. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे अपरिमित नूकसान होणार आहे. प्रतिवादी वयस्कर व ह्दय विकाराचे पेशंट आहेत. प्रतिवादी त्याने खरेदी केलेल्या मिळकतीत बांधकाम करणार आहेत. वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**३.** दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीचे विधीज्ञ यांनी प्रतिवादी यांनी आजपर्यंत स्थगितीच्या आदेशाचे पालन केले आहे व ते पुढील तारखेपर्यंत करण्यास तयार आहेत असे लिहुन दिले आहे. दिनांक २८.११.२०२४ चे आदेशानुसार वादी प्रतिवादी यांनी निशाणी ५ वर पुढील तारखेस युक्तीवाद केला नाही तर स्थगिती आदेश रद्द (Vacate) करण्यात येईल असे आदेशीत केले आहे. वादीचे वकीलांनी ते पुढील तारखेस युक्तीवाद करण्यास तयार असल्याचे

सांगितले. सबब दिनांक २८.११.२०२४ रोजी निशाणी २७ वरील केलेला आदेश रद्द करणे योग्य होईल. सबब वरील सर्व कारणमिमांसेवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

दिनांक २८.११.२०२४ रोजी निशाणी २७ वरील केलेला आदेश रद्द (Vacate) करण्यात येत आहे.

SMRUTI SAGAR PALSULE
Digitally signed by SMRUTI SAGAR PALSULE
Date: 2024.12.05 15:33:50 +0530

ठिकाण - वाई. (एस.एस.पळसुले)

दिनांक -०५.१२.२०२४ तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.